# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Malegaon + Cyber Cell**

**Date of Good Work done** :- **08/06/2022**

**Brief of the work done :-**

वाटमारी करून पैसे व मोबाईल जबरीने हिसकावून घेणाऱ्या चोरट्यास पोलीस स्टेशन मालेगाव व सायबर सेल वाशीम यांनी तांत्रिक तपास करत अटक केली.

## वाटमारी करुन पैसे व मोबाईल चोरणा-याला अटक

### मालेगांव पोलिसांची हायटेक कामगिरी

**वाशिम संदेश, फुलचंद भगत**



वाशिम:-मालेगांव येथील संदेश गंगाराम देवकर वय 52 वर्ष व्यवसाय मुख्याध्यापक रा.पातुर हे गांगलवाडी येथील शाळेवर मुख्याध्यापक असुन ते दि.08 एप्रिल रोजी शाळा संपवुन त्यांची मोटार सायकल ने पातुर येथे जात असतांना दोन अज्ञात इसमांनी मोटार सायकलवर येवून त्यांना अडवुन त्याचेजवळील एक मोबाईल किमंत 10000 / -रु व नगदी 3000 / -रु.असा एकुण 13000 / -रु.चा माल जबरीने हिस्कावुन घेवुन गेले होते वरुन पो.स्टे.मालेगांव येथे अज्ञात आरोपीतां विरुध्द अप.क्र.119/21 क.392 ,34 भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता सदर गुन्हयाचे तपासा मध्ये फिर्यादी यांचा चोरीस गेलेला मोबाईल चे आधारे तांत्रीक पध्दतीने सदर मोबाईलचा शोध लावुन इसम नामे प्रशांत विठ्ठल ढगे वय 23 वर्ष रा पातुर यास ताब्यात घेवून सदर गुन्हयाचे अनुषंगाने विचारपुस केली असता त्याने व त्याचा एक साथीदार याचे मदतीने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिल्याने आरोपी प्रशांत विठ्ठल ढगे रा पातुर यास दि.7.07.22 रोजी गुन्हयात अटक करून त्याचा वि न्यायालया कडुन दि.09.6.22 पर्यंत पीसीआर मंजुर करुन घेण्यात आला आहे सदर गुन्हयात आरोपीकडुन फिर्यादीचा चोरीस गेलेला मोबाईल किमंत 10000 / - रु.चा जप्त करून हस्तगत करण्यात आला आहे तरी नमुद आरोपी हा पीसीआर मध्ये असतांना त्यांचेकडुन वाशिम जिल्हयातील अजुन गुन्हे उघडकीस आणण्याचा कसोशीने प्रयत्न सुरु आहे सदरची कामगिरी मा.श्री.बच्चन सिंग सर पोलीस अधिक्षक साहेब वाशिम मा.श्री.गोरख भामरे सर,अपर पोलीस अधिक्षक वाशिम श्री.सुनिल पुजारी साहेब उपविपोअ वाशिम यांचे मार्गदर्शना मध्ये पो.नि. किरण वानखडे,सपोनि.गजानन तडसे सपोनि.प्रदीपकुमार राठोड,ASI. रवि सैबेवार पोहेकॉ.प्रशांत वाढणकर नापोकॉ विजय डोईफोडे,व पोहेकॉ. कैलास कोकाटे, पोहेकॉ.गजानन झगरे,पोकॉ.प्रशांत वानखडे यांचे पथकाने केली आहे.